अ.भा.से. (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ अनुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय चाचण्या करण्यास मुदतवाढ देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : भाप्रसे-१५२४/प्र.क्र.२१६/२०२४/भाप्रसे-३,**
मंत्रालय,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०८ एप्रिल, २०२६

<u>वाचा</u> : १. शासन निर्णय समक्रमांक दि.१७.०१.२०२५
२. शासन परिपत्रक समक्रमांक दि.०५.०१.२०२६

**<u>प्रस्तावना</u> –**

अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ अनुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील ४० वर्षे वयावरील अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणी अहवालाचा सारांश त्यांच्या कार्यमुल्यांकन अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर वैद्यकीय तपासण्या शासकीय व निमशासकीय रुग्णालयांकडून करण्याबरोबरच काही खाजगी रुग्णालयातून करण्यासही मुभा देण्यात येते. त्या अनुषंगाने सन २०२४-२५, २०२५-२६ आणि २०२६-२७ या कार्यमुल्यांकन वर्षांकरिता, दि.१७.०१.२०२५ च्या शासन निर्णयान्वये खाजगी रुग्णालये निश्चित करण्यात आली आहेत. सन २०२५-२६ च्या कार्यमुल्यांकन वर्षाकरिता वैद्यकीय चाचण्या करण्याच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दि.०१.०४.२०२५ रोजी वयाची ४० वर्षे पूर्ण असलेल्या, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या दि.०१.०१.२०२६ ते दि.३१.०३.२०२६ या कालावधीत करुन घेणे आवश्यक आहे. तथापि, बरेच भाप्रसे अधिकारी निवडणूक कर्तव्यार्थ अन्य राज्यात कार्यरत असल्यामुळे त्यांना या कालावधीत विहित वैद्यकीय तपासणी करुन घेणे शक्य झालेले नाही, ही बाब विचारात घेऊन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**<u>शासन निर्णय</u>** :-

अ.भा.से.(कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ अनुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी कार्यमुल्यांकन **वर्ष २०२५-२६ करिता वैद्यकीय चाचण्या करुन घेण्याकरिता दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.**

२. वैद्यकीय तपासणीसाठी निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयांनी, उपरोक्त मुदतवाढीच्या कालावधीत त्यांचेकडे वैद्यकीय तपासणी केलेल्या भाप्रसे अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणी अहवालाचा सारांश (प्रपत्र-ब मधील भाग-C अनुसार) दि.१५.०५.२०२६ पर्यंत पोहोचेल अशा पद्धतीने कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन भाप्रसे-३), कक्ष क्र.५५८, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२ या पत्त्यावर पाठवावा.

३. शासन निर्णय दिनांक १७.०१.२०२५ मधील अन्य सर्व तरतुदी कायम राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०४०८११३२५४६९०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARCHANA JAGDISH TAMORE

Digitally signed by ARCHANA JAGDISH TAMORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=B89CC23BA64C2E257250277AA5FBFDC9F82CB978BC5E229E7598BBA40A61D487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=61749DEAF7128E9D69EA5D23C7A15EEA58D13AD6EAF0FA0A656E1BBA62A15BD5, cn=ARCHANA JAGDISH TAMORE
Date: 2026.04.08 11:33:50 +05'30'

**( अर्चना तामोरे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. महाराष्ट्र संवर्गातील ४० वर्षे वयावरील भारतीय प्रशासकीय सेवेतील सर्व अधिकारी.
२. शासन निर्णय दिनांक १७.०१.२०२५ च्या प्रपत्र -अ मधील सर्व खाजगी रुग्णालये.
३. सर्व शासकीय, महानगरपालिका रुग्णालयांचे अधिष्ठाता / जिल्हा शल्य चिकित्सक.
४. अवर सचिव (भाप्रसे-१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. निवड नस्ती ( भाप्रसे-३ )